| | |
|---|---|
| **MHJN020000171990** | विशेष दिवाणी दावा क्र.७०/१९९०<br>सुलोचनादेवी व इतर वि. दुर्गादेवी व इतर<br>CNR-MHJNO20000171990 |

## निशाणी क्र.२८५ वरील आदेश

वादी यांनी निशाणी क्र.२४८ वर दिनांक २२/०४/२०२२ रोजी झालेला आदेश रद्द करुन त्यांना उलट तपासासाठी हजर राहण्याची परवानगी मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२) वादींनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा हा करारपुर्तीसाठी आहे. दरम्यानच्या काळात कोवीड महामारी मुळे प्रकरणात संपरिक्षा होऊ शकली नाही. वादींतर्फे त्यांचे साक्षीचे शपथपत्र दाखल केल्यानंतर प्रतिवादींतर्फे वकील बदलण्यात आले. दोन्ही वादींच्या वकीलांनी प्रकरणात मधस्थी करण्याचा पुरेपुर प्रयत्न केला. परंतु, यश आले नाही. व प्रकरण उलट तपासाठी प्रलंबित ठेवण्यात आले. दिनांक २२/०४/२०२२ रोजी वादी हा आजारी असल्याने उलट तपासासाठी हजर राहू शकत नसल्याने अर्ज निशाणी क्र.२८३ वैद्यकीय प्रमाणपत्रासह देण्यात आला होता. परंतु, न्यायालयाने फेटाळला व वादीचा साक्ष पुर्ण करण्याचा हक्क रद्द करुन प्रकरण वादीच्या पुढील साक्षी पुराव्यासाठी लागले. तरी, न्यायाच्या दृष्टीने सदर आदेश रद्द करुन वादीस उलट तपास पूर्ण करण्यासाठी हजर राहण्याची परवानगी देण्यात यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

३) प्रतिवादींतर्फे प्रस्तुतच्या अर्जाला म्हणणे दाखल केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज हा कायद्याच्या परिभााषेत टिकण्याजोगा नसल्याने नामंजुर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली.

४)   दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पडताळणी केली असता, वादींतर्फे दिनांक १७/०२/२०२१ रोजी त्यांचे साक्षीचे शपथपत्र निशाणी क्र.२४८ वर दाखल करण्यात आले. तद्नंतर कोवीड महामारीमुळे न्यायालयीन कामकाज पुर्ण क्षमतेने चालु नव्हते. तरी, प्रस्तुतचे प्रकरण हे कालमर्यादाबध्द प्रकरण असल्याने त्यामध्ये सरतपास घेवून दिनांक ०४/०४/२०२२ रोजी उलट तपास नोंदविणे सुरु झाले व प्रकरण दोन्ही पक्षकारांच्या व वकीलांच्या समंतीने दिनांक १८/०४/२०२२ रोजी ठेवण्यात आले. परंतु, सदर दिवशी वादी उलट तपास नोंदविण्यासाठी हजर राहीला नाही. त्यामुळे निशाणी क्र.२८३ वर आदेश पारीत होवून वादी विरुध्द सदर आदेश पारीत झाला. मा. उच्च न्यायालयाने प्रस्तुतच्या प्रकरणात कालमर्यादा ठरवून दिली आहे. प्रस्तुतचे प्रकरण हे ३० वर्षापेक्षा जास्त जुने प्रकरण आहे. परंतु, वादी हा वैद्यकीय कारणास्तव हजर राहू शकला नाही हे कथन पाहता व प्रकरणातील वादाचा गुणदोषावर अंतिम निकाल होण्यासाठी तसेच, वादी हा महत्वाचा साक्षीदार असल्याने या सर्व बाबींचा विचार करता, सदर आदेश न्यायाच्या दृष्टीने रद्द करणे उचीत ठरेल. सबब, खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१)   अर्ज रु.५००/– खर्चासह मंजुर करण्यात येतो.

३)   वादीने खर्चाची रक्कम आज रोजी न्यायालयात जमा केल्यानंतर सदर रक्कम शासन जमा करावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by KULKARNI MADHURI SUDHAKAR
Date: 2022.05.05 18:19:24 +0530

(**माधुरी एस. कुलकर्णी**)

दिनांक ०५/०५/२०२२

दिवाणी न्यायाधीश (व.स्तर),

जालना

# <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. फाईल मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्रा प्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव : एम. डी. आढे

न्यायालयाचे नाव : दिवाणी न्यायालय (व.स्तर), जालना

दिनांक : ०५/०५/२०२२

सही/–

एम. डी. आढे

लघुलेखक (नि. श्रे.)